REVIEW OF RESEARCH

# गडचिरोली जिल्हयातील आदिवासी लोकसंख्येचा तुलनात्मक अभ्यास

ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
UGC APPROVED JOURNAL NO. 48514
VOLUME - 8 | ISSUE - 8 | MAY - 2019

प्रवीण परसराम बोरकर

संशोधक ,गडचिरोली.



**सारांश :** –

२६ ऑगस्ट १८८२ रोजी मुळच्या चंद्रपुर जिल्हयाचे विभाजन करून गडचिरोली या नव्या व स्वतंत्र जिल्हयाची निर्मिती करण्यात आली. केद्र शासनाच्या सन २०११ च्या १५ व्या जनगणनेनुसार महाराष्ट्र राज्याची एकूण लोकसंख्या ही ११,२३,७४,३३३ इतकी असून ती देशाच्या एकूण लोकसंख्येच्या ९.२८ टक्के इतकी आहे, तर राज्यातील आदिवासींची एकूण लोकसंख्या ही १ कोटी ५ लाख असून तिचे राज्याच्या एकूण लोकसंख्येशी असलेले प्रमाण हे ९.३५ टक्के इतके आहे. गडचिरोली जिल्हयाची एकूण लोकसंख्या ही १०,७२,९४२ इतकी असून, ती राज्याच्या एकूण लोकसंख्येच्या ०.९५ टक्के इतकी आहे. जिल्हयातील आदिवासींची एकूण लोकसंख्या ही ४,१५,३०६ इतकी असून, आदिवासींचे जिल्हयाच्या लोकसंख्येशी असणारे प्रमाण हे ३८.१७ टक्के इतके आहे. यामुळे गडचिरोली जिल्हा हा आदिवासीबहुल जिल्हा म्हणून ओळखला जातो. गडचिरोली जिल्हयातील आदिवासी लोकसंख्येचा विविध अंगाने अध्ययन करणे हा प्रस्तुत शोधप्रबंधाचा हेतू आहे.

## प्रस्तावना :–

प्रस्तुत संशोधनकर्त्याचे मागील १० वर्षापासून गडचिरोली येथे वास्तव्य आहे. त्यामुळे गडचिरोली जिल्हयातील आदिवासी जमातींशी प्रत्यक्ष संबंध आला. आदिवासी लोकसंख्येचा विचार करता पूवैकडील राज्य सोडल्यास महाराष्ट्र हे मध्यप्रदेश पाठोपाठ दुस–या कमांकाचे राज्य आहे. राज्यात आदिवासींच्या एकूण ४७ जमाती वास्तव्यास आहेत. सन २०११ च्या जनगणनेनुसार राज्यातील भिल्ल, गोंड, महादेव कोळी, वारली, कोकणा आणि ठाकूर यांची एकत्रित संख्या ही राज्यातील एकूण आदिवासींच्या ७३.३ टक्के असल्याचे दिसून येते. आदिवासींच्या एकूण संख्येपैकी भिल्लांची संख्या सर्वात जास्त म्हणजे २१.२ टक्के, गोंड १८.१ टक्के, महादेव कोळी १४.३ टक्के, वारली ७.३ टक्के, कोकणा ६.७ टक्के आणि ठाकूर ५.७ टक्के अ”ी आदिवासी लोकसंख्येची विभागणी आहे. महाराष्ट्रातील एकूण १९ आदिवासी जमातींची लोकसंख्या तर १००० पेक्षाही कमी आहे. भारत सरकारने महाराष्ट्रातील ३ आदिवासी जमातींना आदिम जमाती म्हणून घोषित केले आहे. यामध्ये गडचिरोली जिल्हयातील माडिया गोंड, यवतमाळ जिल्हयातील कोलाम आणि ठाणे व रायगड जिल्हयातील कातकरी या आदिवासी जमातींचा समावेश आहे. आदिवासी जमातींपैकी प्रामुख्याने गोंड, राजगोंड, परधान, माना, हलबी, पारधी इत्यादी आदिवासी जमातींचे जिल्हयात बाहुल्य आहे. जिल्हयातील १६८८ गावांपैकी १४०८ गावे ही आदिवासीबहुल असल्यामुळे गडचिरोली जिल्हा हा आदिवासी जिल्हा म्हणून ओळखला जातो. त्यामुळे गडचिरोली जिल्हयातील आदिवासींची नेमकी लोकसंख्या किती ? हे जाणून घेण्याची जिज्ञासा अभ्यासकर्त्याच्या मनात निर्माण झाली आणि या विषयाची निवड करण्यात आली.

## उदिद्ष्टये :–

प्रस्तुत शोधनिबंध तयार करतांना पुढील उदिदष्टये निश्चित करण्यात आली आहेत.

(१)गडचिरोली जिल्हयातील आदिवासींची एकूण लोकसंख्या व

LBP PUBLICATION

त्यांची टक्केवारी किती आहे याचा अभ्यास करणे.

(२) जिल्हयातील आदिवासींमध्ये स्त्री–पुरूष यांचे लिंग गुणोत्तर किती आहे याचा अभ्यास करणे.

(३) जिल्हयातील आदिवासींची शहरी व ग्रामीण भागातील लोकसंख्या किती आहे याचा अभ्यास करणे.

(४) जिल्हयातील आदिवासीं लोकसंख्येमधील साक्षरतेचा अभ्यास करणे.

**महिती संकलन व संशोधन पध्दती :–**

प्रस्तुत शोधनिबंध तयार करण्यासाठी दुय्यम साम्रगीचा वापर करण्यात आलेला आहे. त्यामध्ये आदिवासी संदर्भ ग्रंथ, शासनाचे वार्षिक आदिवासी उपयोजना अहवाल, मासिके, विविध शोधनिबंध, इंटरनेट यामधून माहितीचे संकलन करण्यात आलेले आहे.

**जनगणना :–**

जनगणना २०११ नुसार गडचिरोली जिल्हयाची एकूण लोकसंख्या १०,७२,९४२ इतकी असून त्यापैकी ५,४१,३२८ पुरूष तर ५,३१,६१४ स्त्रिया आहेत. जिल्हयाच्या एकूण लोकसंख्येशी पुरूष लोकसंख्येची टक्केवारी ५०.४ तर स्त्री लोकसंख्येची टक्केवारी ४९.६ इतकी आहे. जिल्हयात सर्वाधिक लोकसंख्या चामोर्शी तालुक्यात १,७९,१२० इतकी असून सर्वात कमी लोकसंख्या भामरागड तालुक्यात ३६,३२५ इतकी आहे. जिल्हयाच्या एकूण लोकसंख्येच्या चामोर्शी तालुक्याची लोकसंख्या ही १६.७ टक्के असून भामरागड तालुक्याची लोकसंख्या ही जिल्हयाच्या एकूण लोकसंख्येच्या ३.४ टक्के आहे.

आदिवासी लोकसंख्येची मागील ५ जनगणनेनुसार महाराष्ट्र राज्यातील व गडचिरोली जिल्हयातील नेमकी टक्केवारी पुढे दिलेल्या तक्त्यावरून स्पष्ट होते.

| जनगणना वर्ष | महाराष्ट्र राज्याची लोकसंख्या (एकूण) | महाराष्ट्र राज्यातील आदिवासी लोकसंख्या (लाखांत) | महाराष्ट्र राज्यातील आदिवासी लोकसंख्येची टक्केवारी | गडचिरोली जिल्हयाची लोकसंख्या (एकूण) | गडचिरोली जिल्हयातील आदिवासी लोकसंख्या | गडचिरोली जिल्हयातील आदिवासी लोकसंख्येची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १९७१ | ५,०४,१२,२३५ | ३८.४१ | ७.६२ | ५,२२,२२९ | .... | .... |
| १९८१ | ६,२७,८२,८१८ | ५७.७२ | ९.१९ | ६,३७,३३६ | २,५०,५९९ | ३९.३१ |
| १९९१ | ७,८९,३७,१८७ | ७३.१८ | ९.२७ | ७,८७,०१० | ३,०४,५३५ | ३८.६९ |
| २००१ | ९,६८,७८,६२७ | ८५.७७ | ८.८५ | ९,७०,२९४ | ३,७१,६९६ | ३८.३० |
| २०११ | ११,२३,७४,३३३ | १०५.१० | ९.३५ | १०,७२,९४२ | ४,१५,३०६ | ३८.७१ |

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, सन २०११ च्या जनगणनेनुसार गडचिरोली जिल्हयाच्या १०,७२,९४२ लोकसंख्येपैकी आदिवासींची जिल्हयातील एकूण संख्या ही ४,१५,३०६ इतकी असून, त्यांचे जिल्हयातील लोकंसंख्येशी असणारे प्रमाण हे ३८.७१ टक्के इतके आहे.

LBP PUBLICATION

## जिल्हयातील धर्मनिहाय लोकसंख्या :–

गडचिरोली जिल्हयातील धर्मनिहाय लोकसंख्येची उतरत्या क्रमाने केलेली मांडणी ही खालीलप्रमाणे आहे.

| अनु क्रमांक | धर्म | लोकसंख्या (एकूण) | पुरूष | स्त्री | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | हिंदु (आदिवासी धरून) | ९,२७,४११ | ४,६८,४४० | ४,५८,९७१ | ८६.४४ |
| २ | बौध्द | ८२,६९५ | ४१,७६१ | ४०,९३४ | ७.७१ |
| ३ | इतर धर्म | ३०,०४७ | १४,८१९ | १५,२२८ | २.८ |
| ४ | मुस्लिम | २१,०६३ | १०,४६१ | १०,६०२ | १.९६ |
| ५ | धर्म अवर्गीकृत | ६,७१९ | ३,२५५ | ३,४६४ | ०.६३ |
| ६ | ख्रिश्चन | ३,८७२ | १,९८८ | १,८८४ | ०.३६ |
| ७ | शीख | ६८१ | ३६४ | ३१७ | ०.०६ |
| ८ | जैन | ४५४ | २४० | २१४ | ०.०४ |
| एकूण | | १०,७२,९४२ | ५,४१,३२८ | ५,३१,६१४ | २१४ |

## जिल्हयातील अनुसूचित जमाती :–

जनगणना २०११ नुसार जिल्हयाच्या एकूण १०,७२,९४२, लोकसंख्येपैकी आदिवासींची लोकसंख्या ४,१५,३०६ इतकी असून, ती जिल्हयाच्या एकूण लोकसंख्येचया ३८.१७ टक्के आहे. जिल्हयातील ४,१५,३०६ या एकूण आदिवासी लोकसंख्येपैकी २,०७,३७७ पुरूष तर २,०७,९२९ स्त्रिया आहेत.

ग्रामीण क्षेत्रातील आदिवासी जमातींची एकूण लोकसंख्या ३,९८,२६६ इतकी असून त्यात १,९८,७५३ पुरूष तर १,९९,५१३ स्त्रिया आहेत. ग्रामीण भागातील एकूण आदिवासी लोकसंख्येचे प्रमाण हे जिल्हयाच्या एकूण ग्रामीण लोकसंख्येशी ४१.७१ टक्के इतके आहे. सन २००१ च्या जनगणनेनुसार जिल्हयाच्या ग्रामीण भागातील आदिवासींची एकूण संख्या ही ३,६४,५४६ इतकी होती व तिचे जिल्हयाच्या एकूण ग्रामीण लोकसंख्येशी असणारे प्रमाण हे ४०.४ टक्के इतके होते.

शहरी क्षेत्रात आदिवासी जमातींची एकूण लोकसंख्या ही १७,०४० इतकी असून त्यात ८,६२४ पुरूष तर ८,४१६ स्त्रिया आहेत. शहरी भागातील एकूण आदिवासी लोकसंख्येचे प्रमाण हे जिल्हयाच्या एकूण शहरी लोकसंख्येशी १४.४४ टक्के इतके आहे. सन २००१ च्या जनगणनेनुसार जिल्हयाच्या शहरी भागातील आदिवासींची एकूण संख्या ही ७,१५० इतकी होती व तिचे जिल्हयाच्या एकूण शहरी लोकसंख्येशी असणारे प्रमाण हे १०.६ टक्के इतके होते.

जिल्हयात भामरागड, एटापल्ली, सिरोंचा, धानोरा, कुरखेडा, अहेरी, कोरची व मुलचेरा या तालुक्यांत आदिवासींचे प्रमाण जास्त असून, ते जिल्हयातील एकूण आदिवासी लोकसंख्येच्या ७७.२ टक्के आहे.

जनगणना २०११ नुसार गडचिरोली जिल्हयातील आदिवासी जमातींची ग्रामीण व नागरी भागातील जिल्हयाच्या एकूण लोकसंख्येशी असणारे प्रमाण हे पुढे दिलेल्या तक्त्यावरून स्पष्ट होते.

| अनुक्रमांक | तालुका | ग्रामीण / नागरी | लोकसंख्या (एकूण) | अनुसूचित जमाती लोकसंख्या (एकूण) | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|---|
| १ | चामोर्शी | ग्रामीण | १७३४८६ | ३२१५१ | १८.५३ |
| | | नागरी | ५६३४ | ४७२ | ८.३८ |
| | | एकूण | १७९१२० | ३२६२३ | १८.२१ |
| २ | गडचिरोली | ग्रामीण | ९१८११ | २०४८३ | २२.३१ |
| | | नागरी | ५४१५२ | ७९३८ | १४.६६ |
| | | एकूण | १४५९६३ | २८४२१ | १९.४७ |
| ३ | अहेरी | ग्रामीण | १०२३८३ | ५४१३२ | ५२.८७ |
| | | नागरी | १४६०९ | ४१०१ | २८.०७ |
| | | एकूण | ११६९९२ | ५८२३३ | ४९.७८ |
| ४ | आरमोरी | ग्रामीण | ९७०९७ | २३१२० | २३.८१ |
| | | नागरी | ० | ० | ० |
| | | एकूण | ९७०९७ | २३१२० | २३.८१ |
| ५ | कुरखेडा | ग्रामीण | ७८६४३ | ४५३८० | ५७.७० |
| | | नागरी | ७४३० | १४४६ | १९.४६ |
| | | एकूण | ८६०७३ | ४६८२६ | ५४.४० |
| ६ | देसाईगंज (वडसा) | ग्रामीण | ५४८२६ | ५३९३ | ९.८४ |
| | | नागरी | २८७८१ | १८०६ | ६.२७ |
| | | एकूण | ८३६०७ | ७१९९ | ८.६१ |
| ७ | धानोरा | ग्रामीण | ८२६९८ | ५८७४५ | ७१.०४ |
| | | नागरी | ० | ० | ० |
| | | एकूण | ८२६९८ | ५८७४५ | ७१.०४ |
| ८ | एटापल्ली | ग्रामीण | ८१७१३ | ६६५९७ | ८१.५० |
| | | नागरी | ० | ० | ० |
| | | एकूण | ८१७१३ | ६६५९७ | ८१.५० |
| ९ | सिरोंचा | ग्रामीण | ६७३२९ | १६६३९ | २४.७१ |
| | | नागरी | ७४२७ | १२७७ | १७.१९ |
| | | एकूण | ७४७५६ | १७९१६ | २३.९७ |
| १० | मुलचेरा | ग्रामीण | ४५७८७ | १४८३४ | ३२.४० |
| | | नागरी | ० | ० | ० |
| | | एकूण | ४५७८७ | १४८३४ | ३२.४० |
| ११ | कोरची | ग्रामीण | ४२८११ | ३१३३३ | ७३.१९ |
| | | नागरी | ० | ० | ० |
| | | एकूण | ४२८११ | ३१३३३ | ७३.१९ |
| १२ | भामरागड | ग्रामीण | ३६३२५ | २९४५९ | ८१.१० |
| | | नागरी | ० | ० | ० |
| | | एकूण | ३६३२५ | २९४५९ | ८१.१० |

## लोकसंख्येची घनता :–

एखादया प्रदेशाचे एकूण क्षेत्रफळ व त्याठिकाणची एकूण लोकसंख्या यावरून दर चौरस किलोमीटरमध्ये किती लोक राहतात याचे अचूक प्रमाण काढता येते. यावरून निघालेल्या लोकसंख्येच्या प्रमाणास लोकसंख्येची घनता असे म्हणतात.

लोकसंख्येची घनता = एकूण लोकसंख्या ÷ एकूण क्षेत्रफळ

वरील सुत्रावरून आपल्याला गडचिरोली जिल्हयाची घनता काढता येईल.

गडचिरोली जिल्हयाची घनता = एकूण लोकसंख्या ÷ एकूण क्षेत्रफळ
= १०,७२,९४२ ÷ १४४१२
= ७४.१४

वरील सुत्राचा वापर करून आपल्याला गडचिरोली जिल्हयाच्या लोकसंख्येची घनता काढता आली. गडचिरोली जिल्हयाची एकूण लोकसंख्या ही १०,७२,९४२ इतकी असून, जिल्हयाचे क्षेत्रफळ हे १४,४१२ चौ. कि.मी. आहे. त्यामुळेच गडचिरोली जिल्हयाची घनता ही ७४ असल्याचे आपल्या लक्षात येते.

गडचिरोली जिल्हयात लोकसंख्येची घनता अत्यंत कमी असण्याचे कारण म्हणजे जिल्हयातील वनक्षेत्राचे प्रमाण महाराष्ट्रात सर्वाधिक असून, त्यात वास्तव्य करणा–या आदिवासींचे प्रमाण हे खूप जास्त आहे. रस्ते, उद्योगधंदे, शेती, वाहतूक व दळणवळण यांचा विकास व भरभराट न झाल्याने जिल्हयातील लोकसंख्या ही अतिविरळ आहे.

महाराष्ट्रात लोकसंख्येची सर्वाधिक घनता ही मुंबई उपनगर या जिल्हयाची असून ती २०९८० इतकी आहे, तर राज्यात लोकसंख्येची सर्वात कमी घनता ही गडचिरोली जिल्हयाची असून ती अत्यल्प म्हणजे ७४ इतकी आहे. सन २००१ च्या जनगणनेनुसार गडचिरोली जिल्हयाची घनता ही ६७ होती. २०११ जनगणनेनुसार किंचित वाढून ती आता ७४ इतकी आहे.

गडचिरोली जिल्हयाच्या ७४ या घनतेपैकी ग्रामीण भागाची घनता ही ६७ तर शहरी भागाची घनता ही १५६९ असल्याचे दिसून येते.

गडचिरोली जिल्हयाची तालुकानिहाय घनता ही पुढे दिलेल्या तक्त्यावरून आपल्या लक्षात येते.

| अनुक्रमांक | तालुका | लोकसंख्या (एकूण) | आदिवासी लोकसंख्या (एकूण) | घनता |
|---|---|---|---|---|
| १ | चामोर्शी | १,७९,१२० | ३२,६२३ | १३६ |
| २ | गडचिरोली | १,४५,९६३ | २८,४२१ | १६३ |
| ३ | अहेरी | १,१६,९९२ | ९७,०९७ | ५१ |
| ४ | आरमोरी | ९७,०९७ | २३,१२० | १३५ |
| ५ | कुरखेडा | ८६,०७३ | ४६,८२६ | १०३ |
| ६ | देसाईगंज (वडसा) | ८३,६०७ | ७,१९९ | ३१८ |
| ७ | धानोरा | ८२,६९८ | ५८,७४५ | ४८ |
| ८ | एटापल्ली | ८१,७१३ | ९७,०९७ | ३६ |
| ९ | सिरोंचा | ७४,७५६ | ९७,०९७ | ५९ |
| १० | मुलचेरा | ४५,७८७ | १४,८३४ | ६२ |
| ११ | कोरची | ४२,८११ | ३१,३३३ | ६३ |
| १२ | भामरागड | ३६,३२५ | २९,४५९ | २६ |

जिल्हयात लोकसंख्येची सर्वाधिक घनता असलेला तालुका वडसा असून, त्याची घनता ३१८ इतकी आहे. तर सर्वात कमी घनता भामरागड तालुक्यात असून, ती अत्यंत कमी म्हणजेच फक्त २६ इतकी आहे.

## लिंग गुणोत्तर :–

एकूण लोकसंख्येत स्त्रियांची संख्या ही दर हजार पुरूषांच्या तुलनेत किती ? अशा स्वरूपात लिंग गुणोत्तर काढण्यात येते. लिंग गुणोत्तरावरून त्या भागातील सामाजिक स्थितीचे आकलन होते. स्त्री पुरूषांना समान दर्जा असणा–या समाज व्यवस्थेत स्त्री पुरूषांचे लिंग गुणोत्तर हे हजाराच्या जवळ असते. गडचिरोली जिल्हयात पुरूषांच्या तुलनेत स्त्रियांचे प्रमाण कमी आहे.

गडचिरोली जिल्हयातील आणि महाराष्ट्र राज्यातील स्त्री व पुरूष यांचे लिंग गुणोत्तराचे सन १९०१ ते २०११ या कालावधीतील असलेले प्रमाण हे खाली दिलेल्या तक्त्यावरून स्पष्ट होते.

| जनगणना वर्ष | महाराष्ट्र राज्य | | | गडचिरोली जिल्हा | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | एकूण | ग्रामीण | नागरी | एकूण | ग्रामीण | नागरी |
| १९०१ | ९७८ | १००३ | ८६२ | १०२३ | १०२३ | — |
| १९११ | ९६६ | १००० | ७९६ | १००५ | १००५ | — |
| १९२१ | ९५० | ९९४ | ७७६ | १००४ | १००४ | ९८५ |
| १९३१ | ९४७ | ९८७ | ७९० | ९९० | ९९१ | ९५२ |
| १९४१ | ९४९ | ९८९ | ८१० | ९८९ | ९८९ | ९९९ |
| १९५१ | ९४१ | १००० | ८०७ | १००० | ९९९ | १०१३ |
| १९६१ | ९३६ | ९९५ | ८०१ | ९९८ | ९९८ | — |
| १९७१ | ९३० | ९८५ | ८२० | ९८६ | ९८७ | ९६१ |
| १९८१ | ९३७ | ९८७ | ८५० | ९८१ | ९८० | १०१६ |
| १९९१ | ९३४ | ९७२ | ८७५ | ९७६ | ९८२ | ९१० |
| २००१ | ९२२ | ९६० | ८७३ | ९७६ | ९७८ | ९५२ |
| २०११ | ९२९ | ९५२ | ९०३ | ९८२ | ९८४ | ९६६ |

वरील तक्त्यावरून सन १९०१ ते २०११ या कालावधीतील जनगणनेनुसार गडचिरोली जिल्हयातील स्त्री पुरूषांचे लिंग गुणोत्तर हे उर्वरित महाराष्ट्र राज्याच्या तुलनेत जास्त असल्याचे दिसून येते.

## अनुसुचित जमातींमधील लिंग गुणोत्तर :–

### ग्रामीण क्षेत्र :–

गडचिरोली जिल्हयातील अनुसूचित जमातींचे ग्रामीण भागातील स्त्री पुरूष प्रमाण हे दर हजार पुरूषांमागे १००४ स्त्रिया असल्याचे दिसून येते. जिल्हयातील कोरची तालुक्यात दर हजार पुरूषांमागे स्त्रियांचे प्रमाण हे १०४७ असे सर्वाधिक तर मुलचेरा तालुक्यात ते ९५८ असे सर्वात कमी असल्याचे दिसून येते.

जिल्हयातील देसाईगंज (वडसा), कोरची, धानोरा, भामरागड, अहेरी आणि सिरोंचा या तालुक्यातील स्त्री पुरूष लिंग गुणोत्तर हे जिल्हयाच्या सरासरी लिंग गुणोत्तरापेक्षा जास्त आहे. तर उर्वरित तालुक्यांतील स्त्री पुरूष प्रमाण हे जिल्हयाच्या सरासरीपेक्षा कमी असल्याचे दिसून येते.

### शहरी क्षेत्र :–

गडचिरोली जिल्हयातील अनुसूचित जमातींचे नागरी भागातील स्त्री पुरूष प्रमाण हे दर हजार पुरूषांमागे ९७६ स्त्रिया असल्याचे दिसून येते. जिल्हयातील एकूण ६ नागरी क्षेत्रापैकी देसाईगंज (वडसा), कुरखेडा, आष्टी व गडचिरोली या एकूण ४ नागरी क्षेत्रातील आदिवासी स्त्री पुरूषांचे लिंग गुणोत्तर हे जिल्हयातील सरासरी स्त्री

पुरूष लिंग गुणोत्तरापेक्षा जास्त असल्याचे दिसून येते. तर उर्वरित अहेरी आणि सिरोंचा या दोन नागरी क्षेत्रातील स्त्री पुरूष प्रमाण हे जिल्हयाच्या सरासरी स्त्री पुरूष लिंग गुणोत्तरापेक्षा कमी असल्याचे दिसून येते.

**साक्षरता :–**

सन २०११ च्या जनगणनेनुसार जिल्हयातील साक्षरतेचे प्रमाण हे ७४.३६% इतके आहे. जिल्हयातील एकूण साक्षर लोकसंख्या ही ७,०८,३६५ असून त्यात ३,९५,११० पुरूष तर ३,१३,२५५ स्त्रिया आहेत. ग्रामीण भागातील ९,५४,९०९ लोकसंख्येपैकी साक्षर लोकसंख्या ही ६,१३,७७१ असून तिचे प्रमाण हे ७२.५२% इतके आहे. त्यात ३,४४,५९३ पुरूष तर २,६९,१७८ स्त्रिया आहेत. ग्रामीण भागातील साक्षरतेमध्ये ८०.८७% पुरूष ६४.०५% स्त्रिया आहेत शहरी भागातील एकूण १,१८,०३३ लोकसंख्येपैकी साक्षर लोकसंख्या ही ९४,५९४ अर्थात ८९% असून त्यात ५०५१७ पुरूष तर ४४,०७७ स्त्रिया आहेत.

**अनुसूचित जमातींमधील स्त्री–पुरूष साक्षरता :**

**ग्रामीण क्षेत्र –**

गडचिरोली जिल्हयातील ग्रामीण क्षेत्रातील अनुसूचित जमातींमधील एकूण साक्षर लोकसंख्या ही २,३४,६४८ इतकी असून त्यात १,३१,७१४ पुरूष तर १,०२,९३४ स्त्रियांचा समावेश होतो. जिल्हयातील ग्रामीण क्षेत्रातील अनुसूचित जमातीमधील साक्षरतेचे प्रमाण हे ६७.०९% असून, त्यात पुरूष साक्षरतेचे प्रमाण हे ७५.५४% तर स्त्री साक्षरतेचे प्रमाण हे ५८.६९% आहे. जिल्हयातील ग्रामीण क्षेत्रातील स्त्री व पुरूष साक्षरतेतील अंतर हे १६.८५% असल्याचे दिसून येते. जिल्हयातील ग्रामीण भागातील अनुसूचित जमातीमधील निरक्षर लोकसंख्या ही १,६३,६१८ असून त्यात ६७,०३९ पुरूष तर ९६,५७९ स्त्रियांचा समावेश होतो.

**शहरी क्षेत्र –**

गडचिरोली जिल्हयातील शहरी भागातील अनुसूचित जमातीमधील एकूण साक्षर लोकसंख्या ही १३,८२१ असून त्यात ७,३३५ पुरूष तर ६,४८६ स्त्रियांचा समावेश होतो. जिल्हयातील अनुसूचित जमातीमधील साक्षरतेचे एकूण प्रमाण हे ८९.२४% असून त्यात ९४.०९% पुरूष तर ८४.३२% स्त्रियांचा समावेश होतो. शहरी भागातील अनुसूचित जमातीमधील स्त्री–पुरूष साक्षरतेतील एकूण फरक हा ९.७७% असल्याचे दिसून येते. शहरी भागातील अनुसूचित जमातीमधील निरक्षर लोकसंख्या ही ३,२१९ इतकी असून त्यात १,२८९ पुरूष तर १,९३० स्त्रिया आहेत.

**निष्कर्ष :–**

(१) गडचिरोली जिल्हयातील भामरागड, एटापल्ली, कुरखेडा, कोरची, धानोरा या तालुक्यात घनदाट वने असल्यामुळे व वनांच्या सान्निध्यात आदिवासी जमात राहत असल्यामुळे या भागात आदिवासींची लोकसंख्या ही जिल्हयातील इतर तालुक्यांतील आदिवासींच्या लोकसंख्येपेक्षा जास्त असल्याचे दिसून येते.

(२) गडचिरोली जिल्हयाच्या स्त्री पुरूषांच्या सरासरी लिंग गुणोत्तरापेक्षा आदिवासींमधील स्त्री पुरूषांचे सरासरी लिंग गुणोत्तर प्रमाण हे जास्त असल्याने, आदिवासींमध्ये स्त्री व पुरूषामध्ये कोणत्याही प्रकारचा भेदभाव दिसून येत नाही व त्यांना आदिवासी समाजात सारखाच सामाजिक दर्जा प्राप्त असल्याचे दिसून येते.

(3) गडचिरोली जिल्हा हा अत्यंत दाट जंगलाने व्याप्त असल्याने या जिल्हयाची ग्रामीण लोकसंख्येची घनता ही अत्यंत कमी तर नागरी भागात ती त्यामानाने जास्त असल्याचे निदर्शनास येते.

(4) गडचिरोली जिल्हयातील आदिवासी जरी दारिद्रयात व बेरोजगारीत जखडलेला असला तरी त्यांच्यामधील साक्षरतेची टक्केवारी ही त्याच्यामध्ये साक्षरतेच्या बाबतीत असलेली जाणीव जागृती स्पष्ट करते.

**संदर्भ सूची :–**

१. Census 2011 Data – censusindia.gov.in

२. Gadchiroli. Maharashtra – Wikipedia

3. जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन, गडचिरोली जिल्हा सन २०१३.



**प्रवीण परसराम बोरकर**
**संशोधक ,गडचिरोली.**

LBP PUBLICATION